## सरकारच्या कामगार विभागाच्या पुढाकारातून योजना

**विशेष प्रतिनिधी, मुंबई**

**आपला मुलगा-मुलगी** साहेब व्हायला पाहिजे, असे प्रत्येक कामगाराचे स्वप्न असते. महाराष्ट्रातील कामगारांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी राज्य सरकारच्या कामगार विभागाने पुढाकार घेतला असून कामगारांच्या मुलांना अधिकारी होता यावे यासाठी त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन पुरवण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या शहरात हे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग या वर्षीपासून सुरू होणार आहेत.

राज्य सरकारच्या कामगार विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात ४५ लाख कामगारांची नोंद आहे. या मंडळातील कामगारांच्या कल्याणासाठी २०१८-१९ आणि २०१९-२० अशा दोन वर्षांसाठी कामगारांच्या मुला-मुलींना विविध

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

@Jobkatta

मार्गदर्शन पुरवण्याचे काम करण्यात येणार आहे. पोलीस उपनिरीक्षकपासून ते बँक क्लर्क-अधिकारी, रेल्वेतील अधिकारी अशा विविध खात्यांच्या स्पर्धा परीक्षकांबरोबरच राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक अशा अधिकारीपदांसाठी होणाऱ्या परीक्षांची तयारी राज्यातील जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी करून घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठीही मार्गदर्शन करण्यात



या सर्व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी हजारो रुपयांचे शुल्क आकारले जाते. पण कामगारांच्या मुलांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या मार्गदर्शन वर्गासाठी ५०० रुपये तर राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी २५० रुपये असे नाममात्र शुल्क आकारले जाणार आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठीची जबाबदारी नाशिकच्या स्पेक्ट्रम अकादमी या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेणाऱ्या संस्थेकडे देण्यात आली आहे. सध्या या योजनेसाठी एक कोटी रुपयांची

गरजेनुसार ती तीन कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात येणार आहे, असे कामगार विभागाच्या सरकारी आदेशात (जीआर) म्हटले आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या एका वर्गात ३० ते ५० विद्यार्थी असतील. त्याचबरोबर ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गांचे हजारो रुपयांचे शुल्क भरणे कठीण असणाऱ्या राज्यातील कामगारांना या योजनेमुळे मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा